**प्रेस नोट**

स्थानिक गुन्हे शाखा,जळगाव
दिनांक :- 24/01/2018.

प्रति,
मा.संपादक
................

**विषय :- ऐ मेरे वतन के लोगो . . . या देशभक्तीपर चित्रप्रदर्शनी बाबत**

पोलीस अधीक्षक श्री.दत्तात्रय कराळे यांचे कल्पनेतुन दिनांक :- २६ जानेवारी २०१८ च्या अनुषंगाने **ऐ मेरे वतन के लोगो . . . या देशभक्तीपर चित्रप्रदर्शनी चे आज दिनांक - 24/01/2018 रोजी पोलीस मुख्यालयातील मंगलम हॉल येथे मा.नामदार श्री.गिरीष महाजन , जलसंपदा मंत्री , महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे हस्ते उद्घाटन करण्यात आले. सदर चित्रप्रदर्शनी मध्ये 26 / 11 / 2008 रोजी मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्याच्या घटनेच्या संबंधी तीन दिवसात पोलीसांनी दिलेल्या कडव्या लढयाबाबत , केलेले मदत कार्य , भितीच्या सावटाखाली असणा-या मुंबईकरांचे जनजिवन सुरळीत करण्यासाठी पोलीस दलाने केलेल्या प्रयत्नांची व ऑपरेशन यशस्वीतेचे छायाचित्रांची मांडणी करण्यात आली आहे.**

**चित्र प्रदर्शनात दालन क्रमांक 2 मध्ये महाराष्ट्रातील नक्षलप्रभावीत गडचिरोली जिल्हयातील नक्षलवादाच्या ( माओवादी ) समस्येवर प्रकाशझोत टाकुन तेथील आदीवासी जनजिवन , नक्षलवादी चळवळ व संघटन त्यांच्या विघातक कार्यवाया तेथील विकासकामात अडथळे आणणा-या बाबी , नक्षलविरोधी अभियानात महाराष्ट्र शासन व गडचिरोली पोलीस दल करत असलेले प्रयत्न या बाबतच्या छायाचित्रांची मांडणी करण्यात आलेली आहे.**

**चित्र प्रदर्शनात दालन क्रमांक 3 मध्ये U N Mission in Kosova 2002 चे नेतृत्व करणारे** पोलीस अधीक्षक श्री.दत्तात्रय कराळे यांनी व त्यांच्या पथकाने केलेल्या कामगिरीचे , तसेच वाहतुक नियमांचे पालन करणे बाबतच्या छायाचित्राची मांडणी करण्यात आलेली आहे. सदरच्या कार्यक्रमास जिल्हाधिकारी मा.किशोरराजे निंबाळकर , अपर पोलीस अधीक्षक श्री. बच्चन सिंह, SDPO श्री. सचिन सांगळे,जिल्हा माहिती अधिकारी श्री. विकास बोडके, प्रोबी.DYSP श्री.धनंजय पाटील, पोलीस निरीक्षक श्री.सुनिल कुराडे, राखीव पोलीस निरीक्षक श्री.सुभाष कावरे, सपोनि.श्री. सागर शिंपी इत्यादी पोलीस अधीकारी उपस्थित होते.

पोलीस अधीक्षक श्री.दत्तात्रय कराळे यांनी आवाहन केले आहे की,सदरची चित्र प्रदर्शनी आज पासुन पुढील आठ दिवस सर्व नागरिकांसाठी , शालेय / महाविदयालयाचे विद्यार्थासाठी खुली राहणार असुन तरी मोठया संख्येने नागरिकांनी व शालेय विद्यार्थ्यानी या चित्रप्रदर्शनीचा लाभ घ्यावा.

सदर चित्रपदर्शनी यशस्वी करणे करीता पोलीस निरीक्षक श्री. सुनिल कुराडे, सपोनि. श्री. सागर शिंपी, पोहेकॉ. चंद्रकांत पाटील, सतिष हाळणोर, स.फौ. काबंळे ,मुजफ्फरअली सैयद , दिनेश बडगुजर, जयंत चौधरी, संदीप सावळे इत्यादींनी परिश्रम घेतले.



शांत मुंबई...



दालन क्र. १
२६/११ 'दहशतवाद'
वेळ रात्री ९ ते ९:१५ ...
अचानक मुंबईवर आतंकवादी हल्ला....


धुमसता संघर्ष नक्षलवादाविरुध्द
पोलीस-नक्षली चकमकीत ठार नक्षलवादी
व जप्त हत्यारे, दारुगोळा, साहित्य
अंधारातून...
अडथळे...


पोलीस उपनिरीक्षक


महाराष्ट्र पोलीस गणवेशाचा प्रवास...


Very Good
अभिप्राय